# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.२५/०२/२०२०

## दोन खुनाचेगुन्हे असणारा कुख्यात आरोपीला पिस्टल व जिवंत काडतुससह अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

दिनांक २५/०२/२०२० रोजी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस उप निरीक्षक एस डी निलपत्रेवार व पोलीस हवालदार शिवानंद स्वामी यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि,चाकण पोलीस ठाणेच्या अभिलेखावर दोन खुनाचे गुन्हे दाखल असलेला व चाकण-म्हाळुंगे परिसरातील लोकांमध्ये दहशत असलेला कुख्यात गुन्हेगार संतोष मधुकर मांजरे वय २९ वर्षे, धंदा- शेती रा. मुळ मांजरेवाडी सध्या कोरेगाव खुर्द ता.खेड जि.पुणे हा निगडी ओटास्किम भागात येणार असल्याची माहीती मिळालेने गुन्हे शाखा युनिट २ कडील पथकानेभक्ती शक्ती चौक ते त्रिवेणीनगर चौकाकडे जाणारे रोडवर सम्राट अशोक बिल्डींग जवळील रोडवर ओटास्किम भागात सापळा लावला असतांनाआरोपी संतोष मांजरे हा रिक्षामधुन येवून भिंतीच्या कंपाउंडलगत थांबुन कोणाची तरी वाट पाहत थांबला असतांना त्याचा संशय आल्याने त्यास शिताफीने पकडले व त्याचेकडे चौकशी करीत असतांना तो घाबरुन उडवा उडवीची उत्तरे देत असल्याने त्याची अंगझडती घेतली असता त्याने कमरेला पॅन्टमध्येखोचलेलेएकदेशीबनावटीचेपिस्टलव पिस्टलचे मॅक्झीनमध्ये एक जिवंत काडतुस असल्याचे मिळुनआले ते जप्त करुन घेवून त्यास गुन्हे शाखा युनिट कार्यालयात घेवून येवूनसखोल चौकशी केली असता आरोपी संतोष मांजरे याचेकडे कोणताही परवाना नसतांना बेकायदेशीर रित्या पिस्टल सारखे घातक हत्यार बाळगुन मिळुन आल्याने त्याचेविरुध्द भारतीय हत्यार कायदयान्वये निगडी पोलीस ठाणेकडे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयात त्यास अटक करण्यात आली आहे. आरोपी संतोष मधुकर मांजरे व त्याचा साथीदार मंगेश गाडे यांनी मार्च २०१३ मध्ये दत्तात्रय नामदेव धनवट रा. कोरेगाव खुर्द याचेवर कोयत्याने वार करुन खुन केला होता संतोष हा त्याच गुन्हयात फरार असतांनाच पुन्हा एप्रील २०१३ मध्ये संतोष व त्याचे साथीदार कैलास जावळे व सागर जावळे अशांनी राजकीय वादाचे कारणावरुन धनंजय वसंत आवटे रा.कुरकुंडी याचा पिस्टलातून गोळी झाडून व कोयत्याने वार करुन निघृनपणे खुन केला होता.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संयज निलपत्रेवार, सहा.पो.फौजदार दिलीप चौधरी, संपत निकम,संजय पंधरे,पोहवा. शिवानंद स्वामी, केराप्पा माने, प्रमोद वेताळ, मपोहवा उषा दळे, विपुल जाधव, आतिष कुडके, शिवाजी मुंडे ,अजित सानप ,नामदेव राऊत,नामदेव कापसे यांचे पथकाने केली आहे.


पोलीसआयुक्तालय गुन्हे शाखा युनिट२


पोलीसआयुक्तालय गुन्हे शाखा युनिट२